रत्नागिरी विमानतळाच्या विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासंदर्भात.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/प्र.क्र.१४६/२८-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. ९ मे, २०१८.

<u>वाचा</u> : १. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं-२०१०/प्र.क्र.४२/भुसं/५२५, दि.२४ जुलै २०१७
२. शासन समक्रमांक निर्णय दि.२५.०७.२०१७
३. शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र.विचासं-१११८/ प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३ एप्रिल २०१८

<u>प्रस्तावना</u> :

केंद्र शासनाच्या Regional Connectivity Scheme अंतर्गत पहिल्या टप्प्यात रत्नागिरी विमानतळाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू विमानतळ भारतीय तटरक्षक दलाच्या ताब्यात आहे. सदर विमानतळाची सद्यस्थितीतील धावपट्टी १३७२ मी. (४५०० फूट) लांबीची आहे. तथापि, Regional Connectivity Scheme योजनेअंतर्गत रत्नागिरी विमानतळ Bombardier/ ATR ७२ प्रकारची विमाने वाहतुकीसाठी व इतर अनुषंगिक सेवा पुरविण्यास सक्षम व्हावा, याद्दष्टीने सदर धावपट्टीची लांबी वाढवून ती २१३५ मी. (७००० फूट) करण्याची मागणी तटरक्षक दलाने केली आहे. याखेरीज, रत्नागिरी विमानतळावरुन सुरक्षित नागरी विमान वाहतूक व्हावी, याद्दष्टीने आवश्यक त्या सुविधा (Parallel Taxi Track, Isolation Bay, Dispersal & other allied facilities) निर्माण व्हाव्या यासाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या धावपट्टीच्या पश्चिमेस मिरजोळे गावातील सुमारे २५ हेक्टर जमीन राज्य शासनाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, अशी भारतीय तटरक्षक दलाने मागणी केली आहे.

२. सदर विषयाबाबत दि.४.०७.२०१७ रोजी मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार रत्नागिरी विमानतळ विकासासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांना शासन निर्णय दि.२५/०७/२०१७ अन्वये “भूसंपादन संस्था”(Nodal Agency) म्हणून घोषित करण्यात आले आहे.

३. सदर बैठकीत रत्नागिरी विमानतळ विकासासंदर्भात किती जमीनीचे भूसंपादन करणे आवश्यक आहे, तसेच यासाठी किती निधी आवश्यक आहे याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात येऊन तो शासनास सादर करण्याबाबत मुख्य सचिव महोदयांनी निर्देश दिलेले होते. त्यानुसार, रत्नागिरी विमानतळाच्या विकासासाठी एकूण ३३.८१ हे.आर जमीन संपादन व त्यापोटी होणाऱ्या अंदाजित रु.२६.०० कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (मर्या.) यांनी शासनास सादर केला आहे.

४.	महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या सदर प्रस्तावास मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली असून त्याबाबत खालीलप्रमाणे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

रत्नागिरी विमानतळ विकासासाठी खाली तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे भूसंपादन तसेच विकासकामांना व त्यापोटी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

| क्र. | बाब | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | विमानतळ आधुनिकीकरणासाठी २.२१ हे.आर. जमिनीचे संपादन + पॅरलल टॅक्सी ट्रॅकसाठी २१.६० हे.आर. जमिनीचे संपादन + टर्मिनल बिल्डिंगसाठी १० एकर जमिनीचे संपादन | रु.१०.०० कोटी |
| २. | टर्मिनल बिल्डींग बांधकाम | रु.१०.०० कोटी |
| ३. | विमानतळाचे परिचालन व देखभालीचा वार्षिक खर्च (**आवर्ती**) | रु.६.०० कोटी |
| | **अंदाजित एकूण खर्च** | **रु.२६.०० कोटी** |

२.	या बाबतचा होणारा खर्च मागणी क्रमांक एन-७, ३०५३ नागरी विमानचालन, ०२ विमानतळ, १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य, राज्य योजना (००) (०२) विमानतळाच्या विकासाकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सहायक अनुदान (३०५३ ०१६४) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या उद्दिष्टाखाली संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा, व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. याबाबत उपसंचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

३.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०५०९१६५९२५५८०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Madhav Vaman Godbole

Digitally signed by Madhav Vaman Godbole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4d2dece5f3a4f469a1e421d9386418a11b3c1d62679cb7656ad02d464d1fb40f, serialNumber=e3e5082948977afe1d60c7937a8e48890a10857adbef0fda2aacc8fad7e55a9d, cn=Madhav Vaman Godbole
Date: 2018.05.09 17:37:12 +05'30'

**(मा.वा.गोडबोले)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक

२. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
४. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अप्पर मुख्य सचिव, मा.मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय,मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव( उद्योग), उद्योग,उर्जा व कामगार विभाग,मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई
९. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
१०. प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
११. संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
१२. अपर महानिदेशक, तटरक्षक कमांडर (पश्चिमी समुद्रतट), रत्नागिरी
१३. महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४. जिल्हाधिकारी, रत्नागिरी
१५. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१६. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१९. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती.